**नाटककाराच्या शोधात...**

सातत्याने प्रयोगशील नाट्यनिर्मिती, विविध नाट्यप्रशिक्षण आणि अन्य कार्यशाळा आयोजित करुन गेली ४५ वर्षे आविष्कार या नाट्यसंस्थेने महाराष्ट्रात नाट्यजाणिवा प्रगल्भ करण्यात तसेच नाटकाच्या सर्वांगांमध्ये नव्या पिढ्या तयार करण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. याच परंपरेतील पुढील पाऊल म्हणजे **नाटककाराच्या शोधात...**

लेखन ही स्वयंभू प्रक्रिया आहे किंवा लेखक जन्मावाच लागतो हे जरी खरं असलं आणि लेखनच नव्हे तर कुठल्याही कलेबाबत हे म्हणता येत असलं तरी प्रशिक्षणाने त्या त्या कलेतील जाण, सखोल दृष्टीकोन आणि तंत्र सुयोग्य पध्दतीने विकसित करता येते हे सिद्ध झाले आहे. याच भूमिकेतून आविष्कारने तरूण नाटककार घडवण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.
**नाटककाराच्या शोधात...** ही तरुण नाटककार घडवण्याची आणि त्यांच्याकडून नव्या सकस नाट्यसंहिता लिहून घेण्याची कार्यशाळा जून ते ऑक्टोबर २०१५ अशी ५ महिने चालणार आहे. या कालावधीत एकूण पाच टप्पे असतील.

पहिला टप्पा : व्यक्तिगत मुलाखत
दुसरा आणि तिसरा टप्पा : ३ ते ५ दिवसांचे निवासी शिबिर
चौथा टप्पा : अवलोकन
पाचवा टप्पा : ३ ते ५ दिवसांचे निवासी शिबिर
(व्यक्तिगत मुलाखतीसाठी निवड झालेल्या प्रवेशकर्त्यांना मुंबईत यावे लागेल आणि त्यासाठीचा प्रवास, निवास, भोजन खर्च स्वतः करणे बंधनकारक असेल.अंतिम निवड झालेल्या प्रवेशकर्त्यांचा कार्यशाळेच्या पुढील टप्प्यांवरील प्रवास, निवास, भोजन खर्च आविष्कार तर्फे करण्यात येईल.)

मराठी रंगभूमीवरील प्रख्यात नेपथ्य- प्रकाशयोजनाकार, दिग्दर्शक प्रदीप मुळये, प्रख्यात नाटककार शफाअत खान व जयंत पवार हे या कार्यशाळेचे संचालक असून या तिघांसह इ़तर तज्ज्ञांची समिती निवडप्रक्रियेत सहभागी असेल. आवश्यकतेनुसार इतर नाटककार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ मार्गदर्शक म्हणून सहभागी होतील.

निवडप्रक्रिये विषयी…
आलेल्या प्रवेशिकांमधून निवडक प्रवेशकर्त्यांची निवड तज्ञ समिती करेल.
या निवडक प्रवेशकर्त्यांना व्यक्तिगत मुलाखतींसाठी मुंबईत यावे लागेल.
व्यक्तिगत मुलाखतींनंतर अंतिम प्रवेशकर्त्यांची निवड जाहिर करण्यात येईल.

कार्यशाळेची नियमावली…

१) सदर कार्यशाळेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी आजवर किमान एक **स्वतंत्र** एकांकिका किंवा दीर्घांक किंवा नाटक लिहिले असणे आवश्यक आहे.
२) वयोगटः वय वर्षे २५ ते ३० मधील लेखक, लेखिकांसाठी प्रवेश मर्यादित.
३) कार्यशाळेच्या सर्व सत्रांमध्ये सहभागी होणे बंधनकारक असेल.
४) आजवरच्या स्वतःच्या **स्वतंत्र** लिखाणातील कोणत्याही एका एकांकिका किंवा दीर्घांक किंवा नाटकाची एक प्रत आणि सोबत सुचलेल्या नव्या एकांकिका किंवा दीर्घांक किंवा नाटकाची संकल्पना awishkar@awishkartheatre.com या email id वर थोडक्यात लिहून पाठवणे बंधनकारक आहे. email मध्ये स्वतःचे नाव, पत्ता, दूरध्वनी, मोबाईल क्रमांक यांचा उल्लेख आवश्यक तसेच आपल्या विभागातील नाट्यकलेशी संबंधित एका प्रसिध्द व्यक्तीचे संदर्भपत्र email मध्ये जोडणे बंधनकारक.
५) १०जून २०१५ पर्यंत email पोहोचणे आवश्यक.
६) तज्ञ समितीची निवड अंतिम असेल.
७) सोबत पुढील प्रश्नांची उत्तरे देणे अपेक्षित…

- आवडते लेखक आणि नाटककार
- आवडती, नावडती नाटके
- अलिकडे पाहिलेले नाटक
- अलिकडे वाचलेल्या पुस्तकांची नावे
- नाटक लिहावेसे का वाटते ?

अधिक माहितीसाठी संपर्क : 022 24445871 (सायं. ६ ते ९)
www.awishkartheatre.com